# पुढच्या वर्षी लवकर या...




























१) लांडगे लिंबाची तालीम भोसरी. २) कानिफनाथ मित्र मंडळ भोसरी (गावठाण). ३) छत्रपती मित्र मंडळ भोसरी. ४) लांडगे ब्रदर्स ॲन्ड फ्रेंड्स सर्कल भोसरी (गावठाण). ५) श्रीराम मित्र मंडळ लांडगे आळी भोसरी. ६) श्री कृष्ण मित्र मंडळ गवळी नगर. ७) समस्त गव्हाणे तालीम मित्र मंडळ भोसरी. ८) नायसाहेब प्रतिष्ठान भोसरी (गावठाण). ९) उंबऱ्या गणपती मित्र मंडळ दिघी रोड. १०) नरवीर तााजी तरूण मंडळ दिघी रोड. ११) खंडोबा मित्र मंडळ खंडोबा माळ. १२) पठारे लांडगे तालीम भोसरी. १३) फुगे-माणे तालीम मित्र मंडळ.

# गणेश विसर्जन मिरवणुकीत गणेश मंडळांचा सत्कार, पाणी वाटप, आझम कॅम्पस शी संलग्न संस्थांचा उपक्रम




**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन सोसायटी, डॉ. पी. ए. इनामदार युनिव्हर्सिटी, सुफी वारकरी विचार मंच, अवामी महाज सामाजिक संघटना आणि मुस्लिम को ऑपरेटिव्ह बँक यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश विसर्जन मिरवणुकीत गणेश मंडळांचा,पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला आणि कार्यकर्ते, पोलीस आणि नागरिकांना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. ४० मंडळांच्या अध्यक्षांचा शाल,श्रीफळ,गुलाबाचे फुल देऊन सत्कार करण्यात आला आणि २० हजार पाण्याच्या बाटल्या वाटण्यात आल्या. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता शतरंजीवाला जमात खाना चौक (लक्ष्मी रस्ता) येथे उभारलेल्या स्वागत कक्षात हा उपक्रम पार पडला. महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी'च्या उपाध्यक्ष आबेदा इनामदार, एड. इफ्तेकार इनामदार, सुफी विचार मंचचे अध्यक्ष मशकूर शेख, सचिव उमर शरीफ शेख, मुस्लिम को ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक मोहम्मद गौस उर्फ बबलू सय्यद, संचालक अफझल खान, मुनव्वर शेख, 'अवामी महाज' सामाजिक संघटनेचे सचिव वाहिद बियाबानी, मुश्ताक पटेल, रौफ शेख, असिफ शेख, वहाब मणियार, शब्बीर भाई हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मशकूर शेख, उमर शरीफ शेख, मोहम्मद गौस उर्फ बबलू सय्यद, वाहिद बियाबानी, साबीर शेख, बद्रुद्दिन शेख, सादिक लुकडे, फिरोज चांद शेख यांनी केले.

# गणपती उत्सवातील गर्दीत मोबाईल चोरी करणाऱ्या विधीसंघर्षीत बालक ताब्यात

**पुणे । प्रतिनिधी**

गणपती उत्सवातील गर्दीत मोबाईल चोरी करणाऱ्या विधीसंघर्षीत बालक मार्केटयार्ड पोलीसानी ताब्यात घेतले. त्याचेकडे एकुण वेगवेगळ्या कंपन्याचे १३ मोबाईल फोन असुन एकुण ८७ हजार रु. किंमतीचे मोबाईल जप्त करण्यात आल्याची माहिती मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनिषा पाटील यांनी दिली.

तपास पथकातील पोउपनि सुनिल भापकर, व पोलीस स्टाफ मार्केटयार्ड आंबेडकरनगर बैल बाजार येथे पेट्रोलींग करीत होते. पोलीस अंमलदार कौस्तुभ जाधव व थोरात यांना बातमी मिळाली की, एकजण ज्याचे अंगात पांढ-या रंगाचा ज्याच्या वर राखाडी डिझाईन असलेला शर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातली आहे. तो स्वप्नपुर्ती सोसायटीच्या समोर असणा-या पार्किंगच्या भिंती लगत हातात पांढ-या रंगाची पिशवी घेवुन थांबला असुन तो चोरीचे मोबाईल विक्री करण्यासाठी आला असल्याची माहीती मिळाली. पोउपनि भापकर यांनी पोलीस अंमलदार राऊत यांना रस्त्याने जाणाऱ्या दोन जणांना पंच म्हणुन बोलावुन घेण्यास सांगितले. त्यावेळी नमुद संशयित इसमास त्याचे नाव व पत्ता विचारता तो एक विधीसंघर्षीत बालक असल्याने त्याची अंगझडती घेतली.

अधिक तपास करता तो उडवा उडवीची उत्तरे देवु लागला असल्याने त्यास अधिक विश्वासात घेवुन त्याचाकडे तपास करता त्याने सांगितले. हमाल नगर व मार्केट यार्ड परीसरातुन मोबाईल फोन चोरी केले आहेत. त्याचेकडे एकुण वेगवेगळ्या कंपन्याचे १३ मोबाईल फोन असुन एकुण ८७ हजार रु. किंमतीचे मोबाईल जप्त करण्यात आले.

# हजरत महमद पैगंबर जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांची भव्य अभिवादन मिरवणूक

## मिरवणुकीद्वारे देणार शैक्षणिक, सामाजिक व पर्यावरणाचे संदेश

**पुणे । प्रतिनिधी**

'महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी' (आझम कॅम्पस) आणि संलग्न संस्थाच्या वतीने मंगळवार, दि. ९ सप्टेबर २०२५ रोजी 'हजरत महमद पैगंबर जयंती'(ईद-ए-मिलाद)निमित्ताने विद्यार्थ्यांच्या अभिवादन मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. पी. ए. इनामदार इनामदार युनिव्हर्सिटी चे कुलपती डॉ. पी. ए. इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या उपक्रमाचे हे २१ वे वर्ष आहे.९ सप्टेंबर रोजी सकाळी ८. ३० वाजता महाराष्ट्र कॉस्मॉपॉलिटन एज्युकेशन सोसायटी'च्या उपाध्यक्ष आबेदा इनामदार यांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन होऊन मिरवणुकीस प्रारंभ होईल. हजरत मोहम्मद पैगंबरांच्या संदेश, घोषवाक्याचे फलक मिरवणुकीचे आकर्षण असेल. संस्थेचे सचिव प्रा. इरफान जे. शेख, संलग्न संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. मिरवणुकीत ५ हजार विद्यार्थ्यांचा समावेश असेल.

मिरवणूक आझम कॅम्पस येथून निघून, डेक्कन मुस्लिम इन्स्टिट्यूट, 'ट्राय लक हॉटेल, बाबाजान दर्गा, सरबतवाला चौक,क्वार्टर गेट, पदमजी चौक, चुडामण तालीम, पूना कॉलेज आणि आझम कॅम्पस गेट येथे मिरवणुकीची सांगता होईल.

# अग्निशमन दलाच्या सतर्कतेमुळे गणेश विसर्जन निर्विघ्न

**पुणे । प्रतिनिधी**

सालाबादाप्रमाणे यावर्षी गणेशोत्सव २०२५ मध्ये इतर यंत्रणेसमवेत अग्निशमन दल दहा दिवस कार्यरत राहात विसर्जनावेळी नदीपात्रात व घाटांवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये याबाबत सतर्क राहून आपले कर्तव्य बजावले.

अग्निशमन दलाकडून पहिल्या दिवसापासून विसर्जन संपेपर्यंत दलाकडून एकुण १२ विसर्जन घाटांवर पालिकेतर्फे नेमण्यात आलेले १२० जीवरक्षक तसेच अग्निशमन दलाचे ३० अग्निशमन अधिकारी व ३० जवान बंदोबस्तावर तैनात होते. तसेच विसर्जनाच्या दोन दिवस मिरवणुक मार्गानजीक अलका चौक, अभिनव चौक व फरासखाना चौक येथे अग्निशमन वाहने दाखल करण्यात आली होती.

दिड दिवस, पाच दिवस, सात दिवस व दहाव्या दिवशी विसर्जनावेळी कोठे ही कोणी बुडाल्याची घटना तर अलका चौकात एक किरकोळ आगीची घटना वगळता आगीच्या घटनेची नोंद नाही. या दहा दिवसाच्या कालावधीत अग्निशमन दलाच्या सर्व अधिकारी व जवान यांच्या सर्व प्रकारच्या रजा व सुट्ट्या बंद ठेवण्यात आल्या होत्या.

''अग्निशमन दलाकडून विविध घाटांवर अधिकारी व जवान यांनी उत्तम कार्य केल्याने गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पडला. अग्निशमन दल नेहमीच सतर्क राहात आपले कर्तव्य बजावत असते.''


